ePaper

# इंदिरा गांधींचा संदर्भ देत उद्धव ठाकरेंची शिंदे गटावर टीका



| वर्ष - 6 | अंक - 178 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- राहुल गांधीच्या त्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ शहरात भाजपच्या वतीने आंदोलन
- सोसायट्यांसाठीचा `वर्कशॉप` फ्लॉप
- दिवस आणि रात्र वैऱ्याची आहे, जागे राहा,

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 10 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## तीन नावे, तीन चिन्हे निवडणूक आयोगाकडे प्रस्ताव

# अखेर ठरलं! उद्धव ठाकरेंनी आयोगाला दिले 3 पर्याय!

### 40 डोक्याच्या रावणानं प्रभु रामाचं शिवधनुष्य गोठवले –उद्धव ठाकरे

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

निवडणूक आयोगाने शिवसेनेचे चिन्ह गोठवल्यानंतर उद्धव ठाकरेंनी जनतेशी संवाद साधला. शिवसेना बाळासाहेब ठाकरे, शिवसेना बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ही तीन नावे निवडणूक आयोगाकडे दिली असल्याची माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. त्याशिवाय त्यांनी पक्षासाठी तीन चिन्हेही निवडणूक आयोगाकडे दिल्याचं सांगितलं. यामध्ये त्रिशूळ, मशाल, उगवता सूर्य ही तीन नावे दिल्याचं उद्धव ठाकरे यांनी सांगितल आहे.



**ज्या शिवसेनेनं मराठी माणसाला आधार दिला. मराठी मन पेटवली. आणि हिंदु आस्मिता जपली. त्या शिवसेनेचा घात करायला निघालात. ते पवित्र नाव गोठवलं. काय मिळणार आहे तुम्हाला... मराठी माणसाठी एकजूट तुम्ही फोडायाला निघालात. या देशात हिंदु म्हणायची कुणाला हिंमत नव्हती, तेव्हा बाळासाहेबांनी ती हिंमत दिली. ती हिंमत तुम्ही गोठवली. हे हिंदुत्व असेच उभं राहिलं नाही, बाळासाहेबांनी अंगावर धोके स्वीकारलेत, असे ठाकरे म्हणाले. शिवसेना आणि तुमच्या नावाच काय संबध आहे... जे नाव माझ्या आजोबांनी दिलं.. वडिलांनी रुजवलं. तेच मी पुढे घेऊन जातोय. तुम्ही त्याचा घात करताय, असेही ठाकरे म्हणाले.**

40 डोक्याच्या रावणानं प्रभु रामाचं शिवधनुष्य गोठवलं. यासाठी थिजलेली मनं आणि गोठलेलं रक्तच पाहिजे. कारण शिवसेना म्हटलं की सळसळतं रक्त आणि तापलेलं डोकं. गोठलेल्या रक्तवाल्याचं इकडे कामच नाही. उलट्या काळजावाल्याचं काम नाही. अशी काही माणसं आणि त्यांची माणसं फिरतात, त्याचा राग येतो. ज्या शिवसेनेनं तुम्हाला राजकीय जन्म दिला. जी शिवसेना तुमची राजकीय आई आहे. त्या आईच्या काळजात कट्यार घुसवली. अशी ही उलट्या काळजाची लोकं, त्यांनी शिवसेना आणि धनुष्यबाण गोठवलं. त्यांना आनंदानं उकळ्या फुटत असतील. पण त्याही मागे त्यांच्या मागे जी महाशक्ती आहे. तिला जास्त आनंद होत असेल.बघा आम्ही करुन दाखवलं. जे आम्हाला जमलं नाही, ते त्यांचीच माणसं फोडून करुन दाखवलं. कशीही माणसं काय मिळवलं तुम्ही, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

ज्या शिवसेनेनं मराठी माणसाला आधार दिला. मराठी मन पेटवली. आणि हिंदु आस्मिता जपली. त्या शिवसेनेचा घात करायला निघालात. ते पवित्र नाव गोठवलं. काय मिळणार आहे तुम्हाला... मराठी माणसाठी एकजूट तुम्ही फोडायाला निघालात. या देशात हिंदु म्हणायची कुणाला हिंमत नव्हती, तेव्हा बाळासाहेबांनी ती हिंमत दिली. ती हिंमत तुम्ही गोठवली. हे हिंदुत्व असेच उभं राहिलं नाही, बाळासाहेबांनी अंगावर धोके स्वीकारलेत, असे ठाकरे म्हणाले. शिवसेना आणि तुमच्या नावाच काय संबध आहे... जे नाव माझ्या आजोबांनी दिलं.. वडिलांनी रुजवलं. तेच मी पुढे घेऊन जातोय. तुम्ही त्याचा घात करताय, असेही ठाकरे म्हणाले.

मुख्यमंत्रीपद ज्यांना हवं होतं, त्यांनी ते घेतलं. त्यांच्याबरोबर ज्यांना सगळं काही देऊनही मनात एक धुसफूस होती. आणखी काही होतं, नाराज होते. देतोय तरी नाराज होते, तेही गेले. ठिकाय. आपण बोललो नाही असं नाही, ते सहन केलं. पण आता जरा अति झालं. शिवसेना प्रमुखांचा मुलगा मुख्यमंत्री नको. मीच व्हायला पाहिजे. इथपर्यंत कुणाकुणाचे हट्ट, मनसुबे असू शकतात. पण आता स्वत: शिवसेनाप्रमुख व्हायला निघालेत. हे जरा अति होतोय. त्याच्यासाठी अवाका काय? याचाही आपल्याला विचार करायचा आहे.

शिवतिर्थावर दसरा मेळावा, होऊ नये म्हणूनही खोकासूरांनी प्रयत्न केले. मैदानाच शिवसेनेला मिळता कामा नये, म्हणून प्रयत्न केले. पण अखेर न्यायदेवता.. देवता या शब्दाला जागली आणि न्याय दिला. दसरा मेळाव्याला गर्दी झाली. चांगला प्रतिसाद मिळाला. त्या दिवशी दोन दसरा मेळावा झाले असे म्हणतात... एका ठिकाणी सर्व काही पंचतारांकित होतं.

# चंद्रकांत पाटील यांचं बोलणं म्हणजे 'विनाशकाले विपरित बुद्धी-अजित पवार

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा चंद्रकांत पाटील यांच्यावर हल्लाबोल

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**भाजपाचे चंद्रकांत पाटील यांना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री केल्याने ते नाराज आहेत. आई-वडिलांना शिव्या द्या पण पंतप्रधान मोदी व शहा यांना काही म्हणून नका असे वक्तव्य करणे दुर्देवी आहे. त्यांचे असं बोलणं म्हणजे 'विनाशकाले विपरित बुद्धी' आहे असे म्हणत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर हल्लाबोल केलायं.**



### महापालिका निवडणूक का घेत नाही..?

**यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबद्दल अजित पवार यांनी चिंता व्यक्त केली. राज्य सरकार सद्यस्थितीत महापालिकांच्या निवडणुका घेण्याच्या मूडमध्ये नाही. त्यांना कोणत्याही परिस्थितीत निवडणुका लांबवायच्या आहेत. अनेक महापालिकांची मुदत संपली आहे. मुदत संपल्यानंतर त्याठिकाणी किती दिवस प्रशासन ठेवायचे यालाही मर्यादा असतात. आता कोरोनाही संपला आहे. तुम्ही मुंबईमध्ये पोटनिवडणुक लावू शकता मात्र, महापालिका निवडणुका घेत नाही यावरून सर्व प्रकार लक्षात येतो. सद्यस्थितीत इच्छुकांचाही खर्च मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यांनी आता खर्चाला थोडा आवर घालावा असा सल्लाही पवार यांनी दिला.**

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत शहरातील विविध समस्यांवर बैठक घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी अजित पवार म्हणाले, आपण एखाद्या संविधानिक पदावर असल्यानंतर अशा पद्धतीने बोलणे चुकीचे आहे. चंद्रकांत पाटील यांनी असे वक्तव्य केल्यामुळे सुसंस्कृतपणा आहे की नाही याची शंका येते.

स्वत:च्या आई वडिलांबाबत असे वक्तव्य करणे म्हणजे 'विनाशकाले विपरित बुद्धी' असल्याचा टोला अजित पवार यांनी लगावला.

# राहुल गांधीच्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ शहरात भाजपच्या वतीने आंदोलन!

## राहुल गांधींनी भारतीय स्वातंत्र्य इतिहासाचा अभ्यास करावा-भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक

।पुणे। महाईन्यूज।

ज्यांच्या पूर्वजांनी देशाची फाळणी केली ते राहुल गांधी भारत जोडो यात्रा काढत आहेत. प्रत्यक्षात या यात्रेतून देश तोडण्याची भाषा केली जाते. अखंड हिंदुस्थानचे स्वप्न पाहणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या संदर्भात आक्षेपार्ह विधाने केली जातात. सावरकर यांच्याबद्दल बोलण्यापूर्वी राहुल गांधींनी भारतीय स्वातंत्र्य इतिहासाचा अभ्यास करावा अशी टीका भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी रविवारी येथे केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेवेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी आक्षेपार्ह



वक्तव्य केले. त्याचा निषेध करण्यासाठी शहर भाजपच्या वतीने शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांच्या नेतृत्वाखाली सारसबाग येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याजवळ आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी मुळीक बोलत होते. शहर सरचिटणीस गणेश घोष ,राजेश येनपुरे, दत्ता खाडे, जितेंद्र पोळेकर, प्रमोद कोंढरे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा स्वातंत्र्यवीर सावरकर

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेवेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केले. त्याचा निषेध करण्यासाठी शहर भाजपच्या वतीने शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांच्या नेतृत्वाखाली सारसबाग येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याजवळ आंदोलन करण्यात आले होते.**

यांचा अवमान करणारे वक्तव्य केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आक्षेपार्ह टीका केली आहे. देशातील काँग्रेसचा जनाधार संपला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि वीर सावरकर यांचा हिंदुत्वाच्या विचाराचा भारतीय जनतेने स्वीकार केला आहे. त्यामुळे नैराश्यातून राहुल गांधी बेताल वक्तव्य करीत आहेत. काँग्रेसला देशात अराजकाची स्थिती निर्माण करायची आहे, असे जगदीश मुळीक यांनी सांगितले.

मुळीक म्हणाले की, स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय परिस्थितीत जाणीवपूर्वक वीर सावरकरांना अपमानित करण्याचे काम केले गेले. आम्ही सर्वच स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करतो. पण, अंदमान कारागृहात काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेले फार थोडे आहेत.

वीर सावरकरांनी अनेकांना क्रांतीची प्रेरणा दिली. राहुल गांधी यांना स्वातंत्र्याचा इतिहास माहिती नाही. आता अशा राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेच्या स्वागतावेळी शिवसेना निषेध करणार की, त्यांच्या तथाकथित भारत जोडो यात्रेच्या स्वागताला जाणार का असा प्रश्न निर्माण होतो.

---

# मुजोर मेस्को सुरक्षारक्षक हतबल

## बाजार समिती प्रशासन हैराण



।पुणे। महाईन्यूज ।

मार्केट यार्डात सुरक्षेसाठी नेमलेले मेस्कोचे (महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादीत) सुरक्षारक्षकच दादागिरी करत असल्याने अडत्यांसह विविध बाजार घटक हैराण झाले आहेत. मेस्कोची सुरक्षा "नको रे बाबा' अशी भूमिका बाजार घटकांकडून घेण्यात येत आहे. तसेच बाजार समितीने सूचना करूनही यात कोणतही फरक पडलेला नाही. त्यामुळे मुजोर मेस्को सुरक्षारक्षक आणि हतबल बाजार समिती प्रशासन अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

बाजार समितीच्या मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांच्या गाळ्यावर सातत्याने चोऱ्या होत आहेत. त्याला चाप बसण्यासाठी बाजार

> **मेस्कोची सुरक्षा व्यवस्था निष्क्रिय असून फक्त प्रवेशद्वारावर उभे राहण्याचे आमचे काम आहे. बाजार आवारामध्ये गस्त घालणार नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येते. त्यामुळे आवारात गस्तच नसल्याने चोरीच्या घटना घडत आहेत. त्याला जबाबदार कोण ?- करण जाधव, सचिव, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड अडते असोसिएशन.विनाकारण कोणालाही त्रास देऊ नका, अशा सुचना त्यांच्या वरिष्ठांना केल्या आहेत. तसेच बाजार आवारातील काही घटकांकडून दादागिरीची भाषा केली जाते. नियमांचे पालन केले जात नाही. त्यामुळे मेस्को आणि त्यांच्यात वाद घडत असतील.**
>
> **- मधुकांत गरड,**
> प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी मेस्कोचे सुरक्षारक्षक नेमले आहेत. मात्र, चोऱ्या होण्याचे प्रमाण कमी झाले नाही. तसेच पूर्वीच्या कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त पैसे खर्च करूनही चोरीच्या घटना घडत असल्याने व्यापाऱ्यांची नाराजी आहे. बाजारात दुपारी दोन ते सायंकाळी सात वाजेपर्यंत गर्दी कमी असते. यावेळी चोरट्यांकडून टार्गेट करण्यात येते.

त्यावेळी सुरक्षारक्षकांची गस्त वाढवावी, बाजार आवारात सीसीटीव्हींची संख्या वाढविण्यात यावी, अशा व्यापाऱ्यांच्या मागण्या आहेत. तर ग्राहकांशी वाद घडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून याची दखल घेतली जात नाही.

बरे वाईट होईल, ते बाजार समितीचेचआम्ही कुणाला भीत नाही. जे काही बरे-वाईट होईल, ते बाजार समितीचे होईल. आम्हाला काय फरक पडणार नाही. थोडीच आमची कायमची नोकरी आहे, अशी भाषा मेस्कोच्या सुरक्षारक्षकांकडून वापरण्यात येत आहे. रविवारी हे दिसून आले. बाजार समिती याला कशा प्रकारे आळा घालणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# कोजागरीनिमित्त पुण्यातील उद्याने रात्री दहापर्यंत खुली



।पुणे। महाईन्यूज ।

शहरातील सर्व उद्याने आज रात्री दहा वाजेपर्यंत खुली ठेवण्याचा निर्णय महापालिकेच्या उद्यान विभागाने घेतला आहे. सारसबाग, जंगली महाराज रस्त्यावरील श्री छत्रपती संभाजी महाराज उद्यान, मॉडेल कॉलनी परिसरातील चित्तरंजन वाटिका उद्यान, कोथरूड येथील थोरात उद्यान, सोमवार पेठेतील शाहू उद्यान, कमला नेहरू उद्यान, हडपसर भागातील लोहिया उद्यान, सहकार नगरमधील काकासाहेब गाडगीळ उद्यान याप्रमुख उद्यानांसह शहराच्या विविध भागातील अन्य लहान उद्याने खुली ठेवण्यात येणार आहेत, अशी माहिती उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे यांनी दिली. कोजागरी पोर्णिमेनिमित्ताने नागरिकांकडून उद्यानामध्ये विविध कार्यक्रम साजरे केले जातात. सायंकाळपासून उद्यानात नागरिकांची गर्दी होते. विविध संस्था, संघटनांकडून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने रोज आठ वाजता बंद होणारी उद्याने कोजागरी पोर्णिमेसाठी रात्री दहा वाजेपर्यंत खुली ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## महापालिकेच्या गलथान नियोजनामुळे

# सोसायट्यांसाठीचा `वर्कशॉप`फ्लॉप!

### माहिती, चर्चा करण्याएवजी पथनाट्य दाखवल्याने पालिकेचा निषेध, सर्वांचा सभात्याग





**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

ओला कचरा जिरवण्याच्या अत्यंत ज्वलंत विषयावर आयोजित महापालिकेचा वर्कशॉप अक्षरशः फ्लॉप शो ठरला. दोन तास शहरातील सोसाट्यांचा ओला कचरा समस्येबाबत सोसायसाठी पदाधिकारयांसाठी महापालिकेच्या वतीने ओला कचरा व्यवस्थापन यावरील वर्कशॉपचे शनिवारी सांगवी येथील निळू फुले सभागृहात ११ ते १ या वेळेत आयोजन करण्यात आले होते. मात्र साडे बारा पर्यंत एकही अधिकारी येथे न फिरकल्याने सोसायटी रहिवाशांनी सभा त्याग करत महापालिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. नाराज सभासदांनी निघून जाणे पसंत केले.

सोसाट्यांच्या कचरा समस्येबाबत महापालिकेला गांभीर्य नाही आता तर या अधिकाऱ्यांना सोसायटी धारकांच्या वेळीचीही किंमत नाही त्यांना आमचे कसलेही सुख दुख नाही. आता पिंपरी-चिंचवड मधील सर्व सोसायटीधारकांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे सोसायट्यात एकी नसल्याने महापालिकेकडून अशी दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात आहे असे पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी पीसीबी टुडे प्रतिनिधी बरोबर बोलताना सांगितले.

या कार्य शाळेला महापालिका आयुक्त शेखर सिंह व संबंधित विभागाचे अन्य अधिकारी मार्गदर्शन करणार होते. कार्यशाळेची वेळ ११ ते १ अशी होती त्यास सुट्टीच्या दिवशी शहरातील सुमारे ४० सहून अधिक सोसायट्यांचे पदाधिकारी वेळ काढून साडे दहा वाजताच हजर झाले होते मात्र, १२.३० पर्यंत एकही अधिकारी सभागृहात उपस्थित न राहिल्याने सोसायटी पदाधिकाऱ्यांनी महापालिकेचा निषेध करत काढता पाय घेतलारागाने घर गाठले.

सोसाट्यांच्या कचरा समस्येबाबत महापालिकेला गांभीर्य नाही आता तर या अधिकाऱ्यांना सोसायटी धारकांच्या वेळीचीही किंमत नाही त्यांना आमचे कसलेही सुख दुख नाही. आता पिंपरी-चिंचवड मधील सर्व सोसायटीधारकांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे सोसायट्यात एकी नसल्याने महापालिकेकडून अशी दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात आहे असे पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी पीसीबी टुडे प्रतिनिधी बरोबर बोलताना सांगितले.

मूळ कार्यक्रम पत्रिकेनुसार ११ वाजता अधिकारी या विषयावर निवेदन करणार होते, परंतु १२ वाजेपर्यंत कार्यक्रम सुरू झाला नाही. **अखेर उपस्थितांनी आरडाओरडा केल्यावर वेळ घालविण्यासाठी पथनाट्य सुरू करण्यात आले. ते पाहून नागरिकांनी संताप व्यक्त केला. आम्ही नाटक पाहायला आलो नाही, मुद्याचे बोलायला आलोत, असे म्हणत अनेकांनी प्रशासनातील कर्मचाऱ्यांवर हल्ला सुरू केला. मुख्य संयोजक सहआयुक्त अजय चारठणकर हे थेट १ वाजता सभागृहात आले. त्यावेळी सोसायटी पदाधिकाऱ्यांनी निषेध करत कार्यक्रमावर बहिष्कार टाकला आणि काढता पाय घेतला.**

---

# कामाशी बांधिलकी असणारे कार्यकर्ते तयार व्हावेत!

### पिंपरी-चिंचवडचे प्रथम महापौर तथा माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचे मत

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**देशात आणि राज्यातील राजकीय वर्तुळात सध्या सुरू असलेला गोंधळ जनता उघड्या डोळ्याने पाहते आहे. नेता जसे वागतो, त्याचे अनुकरण कार्यकर्तेही करतात. वास्तविक, कामाशी बांधिलकी असलेले कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत व त्यांनी जबाबदारी ओळखून वागले पाहिजे, असे मत पिंपरी-चिंचवडचे पहिले महापौर तसेच पहिले आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांनी रविवारी व्यक्त केले.**

कलारंजन प्रतिष्ठानच्या वतीने चिंचवड येथे पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या चाळीसाव्या वर्धापन दिनानिमित्ताने 'पैस रंगमंच' येथे लांडगे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत चौगुले यांनी लांडगे यांच्याशी संवाद साधला. माजी महापौर माई ढोरे, माजी नगरसेवक मधु जोशी, पंडित गवळी, नितीन लांडगे, जयनाथ काटे, शरद काळभोर आदी उपस्थित होते.



या मुलाखतीत बालपणापासून ते आतापर्यंतचा जीवनपट लांडगे यांनी उलगडून सांगितला. पारंपरिक शेती, कुस्तीचे आखाडे, पुणे विद्यापीठाकडून कुस्तीचे कर्णधार म्हणून मिळालेली संधी, १९६७ साली भूषवलेले भोसरीचे सरपंचपद, १९८६ साली नगरसेवक झाल्यानंतर शहराचे पहिले महापौर होण्याचा बहुमान, १९९० साली 'हवेली'तून आमदार म्हणून विजयी, १९९५ ची बहुचर्चित बंडखोरी, पवना बँक आणि पिंपरी-चिंचवड तंत्रनिकेतन शिक्षण संस्थेच्या उभारणीत दिलेले भरीव योगदान आदींचा त्यात समावेश होता. या निमित्ताने लांडगे यांनी विविध आठवणींना उजाळा दिला.

## संपादकीय

# छोट्या गुंतवणूकदारांचे हित जपा

***जगभरात कोठेही दिसली नाही, एवढी शेअर बाजारातील वृद्धी सध्या दिसत आहे. परंतु त्या भरभराटीत सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा समावेश आहे का? 'डिलिस्ट'मुळे होणारे किरकोळ गुंतवणूकदारांचे आर्थिक नुकसान कमी करता येईल काय, या प्रश्नांचा वेध.***

भारतातील शेअरबाजार सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अजब-गजब ठरलेला असून त्याचा लहरीपणा सध्याच्या पावसासारखा झाला आहे. रिझर्व्ह बँक म्हणते निर्देशांकवाढ हा फुगवटा आहे. जगभरात कोठेही दिसली नाही, एवढी वृद्धी भारतात या निर्देशांकामुळे दिसत आहे. तथापि सट्टेबाजांच्या कावेबाज कृत्यांनी श्रीमंत अधिक श्रीमंत झाले आहेत; पण किरकोळ गुंतवणूकदारांचा फायदा किती झाला? ते धनाढ्य झाले काय, याचे उत्तर 'नाही' असे आहे. अशा परिस्थितीत आजकाल शेअरबाजारात, अनेक कंपन्या आर्थिक संकटांमुळे व शेअरबाजार सदस्यत्वाचे वार्षिक शुल्क न भरल्यामुळे त्यांचे शेअर बाजारातील लिस्टिंग चालू ठेवण्यास असमर्थ ठरत आहेत. जेव्हा असे होते, तेंव्हा सदर डीलिस्ट होणाऱ्या कंपन्यांच्या शेअरना 'विक्रीमूल्य' नसल्याने सर्व भागधारकांचे मोठे नुकसान होते. मोठे गुंतवणूकदार, सट्टेबाज आणि गुंतवणूक संस्था सदर डीलिस्ट होणाऱ्या कंपन्यांच्या शेअरमुळे होणारी हानी इतर उत्पादक शेअर व्यवहारातून होणाऱ्या नफ्यातून वजावट घेऊन टाळू शकतात. पण कंपनीच्या भागभांडवलाच्या दोन लाख रुपयांपर्यंतचे समभाग धारण करणारे छोटे भागधारक या रोजच्या खरेदी विक्रीत नसल्याने या फायद्यापासून वंचित राहतात.'दिवाण हाऊसिंग फायनान्स'चे शेअर 'बीएसई' आणि 'एनएसई'वर अंतिम वेळी विकले गेले, त्या दिवशी जास्तीत जास्त घसरू शकणाऱ्या १०% किंमतीच्या पातळीखाली म्हणजे १६.७० रुपयांवर बंद झाले होते. 'एनसीएलटी'च्या आदेशानुसार ज्यावेळी या शेअर बाजारांनी 'डीएचएफएल'मधील व्यापार स्थगित केला, त्यावेळी कंपनीच्या समभागांना कोणतेही 'मूल्य' दिले नव्हते.

# विझू विझू झाल्या ज्योती




आमचे राजकीय नेते सातत्याने आगामी हिवाळा हा 'कठोर' असल्याने तयारीत रहा, असा सावधानतेचा इशारा देत आहेत. वैयक्तिक स्तरावर कोणत्या उपाययोजना करता येतील, या उपाययोजनांचा प्रभाव, परिणामकारकता, शाश्वतता आणि संभाव्य गैरसोयींवर लक्ष केंद्रित चर्चा सुरू आहे. उदाहरणार्थ, घरातील तापमान १९ अंश सेल्सिअसपर्यंत सीमित ठेवण्यास सांगण्यात आले आहे, जे आधी २१ अंश होते. तसेच, आम्हाला थंड पाण्याने आंघोळ (शॉवर) करा, स्वयंपाकघरातील सिंक आणि वॉश बेसिनमधील गरम पाण्याचे नळ बंद करा, वॉशिंग मशीनमध्ये कपडे धुताना ड्रायरचा वापर करू नका, त्याऐवजी कपडे दोऱ्यांवर सुकत घाला आणि ऊर्जेचा वापर कमी करणाऱ्या दिव्यांचा वापर करा, असे नानाविध उपाय सांगण्यात आले आहेत. सार्वजनिक वाहतूक आणि कार्यालयांमधील तापमानही १९ अंशांपर्यंत कमी करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, रात्रीच्या वेळी कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीची आणि कार्यालयाची इमारत अतिप्रकाशित असता कामा नये, असेही सांगण्यात आले आहे. केवळ वृद्धाश्रम या नियमांना अपवाद असतील. येथील आतले तापमान नेहमीप्रमाणे २१ अंश ते २३ अंशांपर्यंत ठेवण्यास मुभा आहे.

सद्यस्थितीत तरी हे उपाय बंधनकारक नाहीत. 'ब्लॅकआऊट' आणि त्याचा आर्थिक उत्पादनावरील प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी, जनतेला ऊर्जावापर कमी करण्यास उद्युक्त करणे, हे त्यामागील उद्दिष्ट आहे. काही उद्योग मोठ्या प्रमाणावर वीज आणि गॅसवर अवलंबून आहेत. टंचाई जाणवल्यास या प्रकल्पांना उत्पादन कमी करावे लागेल आणि त्यांच्या कामाचे तासही कमी करावे लागतील. परिणामी, कर्मचाऱ्यांना कमी वेतन मिळेल परंतु ऊर्जेची किंमत वाढेल. देशातील काही भागांतील वीजबिलांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २७० टक्के वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यस्तरावरील अनेक सार्वजनिक कार्यालये आणि राजधानीतील संसद भवनाने 'थर्मोस्टॅट' म्हणजे हवामान स्वयं-नियमन यंत्रांचा वापर सध्या कमी केला आहे. त्यानंतर



नागरिकांनी घरातही काही बदल करण्यास सुरुवात केली आहे. ते गैरसोयीचे वाटत असले, तरी विजेच्या वापराकडे गंभीरपणे पाहण्याची ही एक संधी मानली जात आहे. सरकारने केलेल्या सूचना सहज स्वीकारल्या गेल्या नाहीत. त्यावर जोरदार चर्चा झाल्या, टीकाही झाली. ख्रिसमस काळात सार्वजनिक ठिकाणी रोषणाईबाबत काय भूमिका घेतली जाते, याची अनेकांना उत्सुकता वाटते. हिवाळा हा खरोखरच थंड, अंधारा आणि उदास असतो. संध्याकाळी चार वाजताच इथे काळोख होतो. अशा वातावरणात ख्रिसमसच्या रोषणाईचा सकारात्मक मानसिक परिणाम दिसत असला तरी त्यामुळे किती वीज खर्च होते याचा विचार आता करावा लागणार आहे. काहींच्या मते हे कृत्रिम दिवे कमी ठेवले किंवा संपूर्णपणे बंद ठेवले तर त्याचा प्रतिकूल परिणाम लोकांच्या आरोग्यावर होईल आणि तसेही त्यातून फार मोठ्या विजेची बचत होणार नाही. मात्र काहींचा या मताला विरोधही आहे. इतर सूचनांबातही दोन्ही बाजूंनी चर्चा झडत आहेत. हिवाळ्यात लोकांना ऊब मिळावी आणि त्यांनी एकत्र यावे, यासाठी इनडोअर स्विमिंग पूल, सोना बाथ आणि मनोरंजनपर उद्याने यांसारख्या काही जागा आहेत. या जागांवर गॅस किंवा विजेने ऊब निर्माण करणे कितपत योग्य आहे? या जागा बंद केल्या तर अशी काय मोठी हानी होणार आहे? असे म्हणणारे आणि या उपायांमळे काय मोठा फरक पडणार आहे, असे विचारणारेही आहेत. ८० लाखांच्या आसपास लोकसंख्येच्या स्वित्झर्लंडला पर्वतराजी, तळे, नद्या आणि घनदाट जंगलांचे वरदान लाभले आहे. हा देश जगण्यासाठी याच संसाधनांवर पूर्णपणे अवलंबूनही आहे. अल्पाइनचा बर्फाच्छादित प्रदेश आणि हिमनद्यांमुळे मोठ्या युरोपियन नद्यांना पाणी मिळते. हवामान बदलामुळे अल्पाइनच्या परिसंस्थेवर किती परिणाम झाला, हे गेल्या १० वर्षांवर नजर टाकल्यास कळेल. हिमनद्यांचे जलद वितळणे, बर्फवृष्टीचे घटणारे प्रमाण आणि उन्हाळ्यात वाढणारा उष्मा यामुळे अनेकांच्या मनात भीती आहे.

# 'सायबर' गुन्ह्यांचे आव्हान

**सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलले आहे. रस्त्यावरील गुन्हेगारी कमी झाली असून, गुन्हेगारांचा कल कमी जोखमीच्या सायबर क्षेत्राकडे वळला आहे. त्यामुळे सायबर फसवणूक रोखण्यासाठी सावधगिरी आणि सायबर साक्षरता हाच उपाय आहे.**

इंटरनेटमुळे दैनंदिन जीवन सुलभ बनले आहे आणि वेळेची बचतही होत आहे. मात्र, या सायबर विश्वात वावरताना कोणती काळजी घ्यावी, काय करावे, काय करू नये याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने या विश्वात टपून बसलेले सायबर चोर संधी मिळताच हल्लाबोल करीत आहेत. पकडले जाण्याची जोखीम कमी आणि फायदाच फायदा असल्याने आर्थिक फसवणूक, सेक्सटॉर्शन, बदनामी, सोशल पाठलाग, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण असे सायबरमधील गुन्हे इतर गुन्ह्यांच्या तुलनेत कित्येक पटीने वर्षागणिक वाढत आहेत.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोने देशभरातील सायबर गुन्ह्यांची जारी केलेली आकडेवारी पाहिली तर हा विषय किती गंभीर आहे याची कल्पना येते. देशभरात २०२१ मध्ये ५० हजार ९७४ सायबर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. हा आकडा २०२० च्या तुलनेत जवळपास सहा टक्क्यांनी अधिक आहे. महाराष्ट्राचा



विचार केला तर २०२१ मध्ये ५५६२ गुन्हे दाखल असून, सायबर गुन्ह्यांमध्ये राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे महिला, लहान मुले यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या लैंगिक शोषणाबाबत नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या आकडेवारीनुसार राज्यात ४८७ गुन्हे आहेत आणि या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. सोशल मीडियाच्या व्यासपीठावर १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांचा बऱ्यापैकी वावर असतो. अमेरिका, तसेच पाश्चात्त्य देशांमध्ये सोशल मीडिया वापरण्यासाठी १३ वर्षे पूर्ण हवीत. मात्र, आपल्याकडे यासाठी कोणतेही नियम, अटी अथवा कायदे नाहीत. या वयोगटातील मुले अल्पवयीन, कमी समज असलेली आणि इंटरनेटबद्दल पुरेसे ज्ञान नसलेली असतात. अशा मुलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले जाते. त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपलेसे करून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. त्यातूनच चाइल्ड पोर्नोग्राफी, 'सेक्सटॉर्शन' यांसारखे गंभीर गुन्हे जन्माला आले आहेत. चाइल्ड पोर्नोग्राफी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक कायदे केल्यानंतर, त्याबाबत धडक कारवाया सुरू आहेत. चाइल्ड पॉर्न व्हिडिओ किंवा त्यासंबंधी कोणता व्हिडिओ, फोटो तुम्ही कुणाला पाठवला तर तुम्हाला जेलमध्ये जावे लागू शकते. हे रोखण्यासाठी अमेरिकेच्या 'नॅशनल सेंटर ऑफ मिसिंग अँड एक्स्प्लॉयटेड चिल्ड्रन'(एनमॅक) ही संस्था चाइल्ड पोर्नोग्राफीच्या विरोधात कार्यरत आहे. समाजमाध्यमे, संकेतस्थळांवरील चाइल्ड पोर्नोग्राफीबाबत ही संस्था अमेरिकेच्या 'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'(एफबीआय) या सर्वोच्च तपास यंत्रणेला माहिती पुरवते.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दिवस आणि रात्र वैऱ्याची आहे, जागे राहा!

## आत्मविश्वासाने मोठी लढाई लढूया; उद्धव ठाकरेंचा निर्धार

**। मुंबई । महाईन्यूज ।**

जून महिन्यापासून राज्यातील राजकारणात नियमित घडामोडी घडत आहेत. अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने शिवेसनेचं चिन्ह आणि नाव गोठवलं आहे. यामुळे शिवसेनेत मोठा हलकल्लोळ माजलाय. मात्र, अशा परिस्थितीतही शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना संमय राखण्याचं आवाहन केलं आहे. सध्या दिवस आणि रात्री दोन्ही वैऱ्याची आहे. त्यामुळे जागे राहा. पण शांत राहा. आत्मविश्वासाने ही मोठी लढाई जिंकायची आहे, असा निर्धार उद्धव ठाकरे यांनी केला आहे. आज त्यांनी सोशल मीडियावर जनतेशी संवाद साधला. मी डरणारा नाही. जनता जो फैसला करेल तो मला मान्य आहे. प्रत्येक शिवसैनिक राबत आहे. तुम्हीच सर्वोच्च आहात. लोकशाहीत जनताजनार्दन श्रेष्ठ आहेत. लोकदरबाकरात मला जायचं आहे, त्यामुळे निवडणूक आयोगाने लवकरात लवकर चिन्ह आणि नाव द्यावं. आपण आधीच निवडणूक आयोगाकडे आपले पर्याय सोपवले आहेत. निवडणूक आयोगाने ते जाहीरही केले. शिंदे गटाचे अद्यापही पर्याय निवडणूक आयोगाने



अजूनही नाव आणि चिन्हासाठी पर्याय सुचवलेले नाहीत. परंतु, निवडणूक आय़ोगाने याबाबत लवकरात लवक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही उद्धव ठाकरे यांनी केली आहे. पुढे ते म्हणाले की, आज कोजागिरी आहे. आपण म्हणतो की रात्र वैराची आहे. पण सध्या दिवस-रात्र दोन्ही वैराची आहेत. त्यामुळे झोपू नका, शांत राहा, आत्मविश्वासाने मोठी लढाई जिंकायची आहे. ही लढाई जिंकल्यानंतर आपल्याला आव्हान देणारं कोणी नसेन, मी प्रत्येक लढाईला सामोरा गेलेलो आहे. ही लढाईसुद्धा जिंकायची आहे, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

### उद्धव ठाकरे रमले भूतकाळात

उद्धव ठाकरे कोण, उद्धव बाळासाहेब ठाकरे. म्हणून मला किंमत आहे. या पक्षाचं प्रमुखपद स्विकारलं तेव्हा काही आठवणी दाटल्य होत्या. १९ शिवाजी पार्कचं घर आताच्या भाषेत वन बीएचकेमध्ये एकत्रित कुटुंब राहायचं. घरी मराठी माणसांची वर्दळ सुरू असायची. मार्मिकमधून शिवसेनाप्रमुख मराठी भाषिकांच्या होणाऱ्या अन्यायावर वाचा फोडण्यास सुरुवात केली. आजोबांनी विचारलं, एवढी गर्दी जमते, पुढे संघटना वगैरे काढणार आहेस की नाही. बाळासाहेबांनी लगेच होकार सांगितला. पण नाव काय ठरवलंस. तेव्हा शिवसेना हे नाव ठरवलं आजोबांनी सुचवलं. त्यानंतर हा संघर्ष सुरू झाला. हा इतिहास सुरू झाला. त्यावेळी कोणीही सोबत नव्हतं. पण गोरगरीब माणसं जिद्दीने आणि चिकाटीने उभी होती. एकदा दत्ता साळवी आमच्या दारात हजर झाला. मी माझ्या नोकरीचा राजीनामा देऊन शिवसेनेत सामील होत असल्याचं त्यानं आम्हाला कळवलं. त्यावेळी नगरसेवक, महापौर, आमदार खासदारकी नव्हती. आपल्या भविष्याचं काय हणार, याचा विचार न करता, मराठी माणसाच्या विचारासाठी हा माणूस काहीतरी करू इच्छितो माझं कर्तव्य आहे, माझं कर्तव्य मी बजावणार, असं अनेकांना वाटत होतं. तिथून सुरुवात झाली. ठाणे पालिकेची निवडणूक आली. पहिलं यश शिवसेनेला ठाण्याने दिलं. निवडून आले. सतीश प्रधानसह अनेकजण आले. श्रमले, मेहनत केली त्यातून शिवेसनेचा विजयाचा रथ पुढे निघाला. मुंबई पालिका आली. त्यातून शिवसेनेचे ४२ निवडून आले. काही जीवाची बाजू लावून शिवसैनिक लढत राहिला. अनेकजण असे आहेत ज्यांनी जीवसुद्धा गमावले आहेत. तुरुंगवास भोगला, पोलिसांचा अत्याचार सहन केला.

### ⏭ आता अती होतंय

कोरोना काळात येऊन मी सूचना करत होतो. माझ्या सूचनांचं पालन करून आपण कोरोना काळावर मात केली. संवाद सुरू असताना अनेकांनी मला सांगितलं की उद्धवजी तुम्ही आमच्या कुटुंबातील एक झालेले आहात. म्हणून मी आजही माझ्या कुटुंबाशी मनमोकळे करायला आलेलो आहे. यापूर्वी मी आपल्यासमोर आलो होतो तो शिवप्रमुखांचा पुत्र मुख्यमंत्री पदी नको म्हणून काहीजणांनी आपल्याशी गद्दारी केली तेव्हा. त्यावेळी मी वर्षा या शासकीय निवासस्थानाचा त्याग केला. आता त्याला दोन-तीन महिने झाले. मुख्यमंत्री पद ज्यांना पाहिजे होतं, त्यांनी ते घेतलं. ते घेऊनसुद्धा त्यांच्यात धुसफूस होते. नाराज असलेले गेले, आपण काही बोललो नाही अशातला भाग नाही, पण आपण सहन केलं. आता मात्र अती व्हायला लागलं आहे, असा आरोप उद्धव ठाकरेंनी आजच्या संवादादरम्यान केला.

### ⏭ दुसरा मेळावा पंचतारांकित

शिवसेना प्रमुखांचा पूत्र मुख्यमंत्री पदी नको हा हट्ट असू शकतो. पण आता स्वतः शिवसेना प्रमुख व्हायला निघाले आहेत. शिवतीर्थावर पारंपरिक दसरा मेळावा होऊ नये म्हणून खोकासुरांनी प्रयत्न केले. न्यायदेवता देवता या शब्दाला जागली आणि न्याय मिळाला. दसरा मेळावा अभूतपूर्व आणि अद्भूत झाला. दोन मेळावे झाले असं म्हणतात. पण मी आपल्या मेळाव्याला गेलो होतो. दुसरा मेळावा पंचतारांकित होता. पण आपला मेळाव्यात दिव्यांग होते, अंध होते. कसलीही सोय नव्हती. गाड्या नव्हत्या. अधरी भाकरी खाईन, उपाशी राहीन पण माझ्या शिवसेनेसाठी काहीही करेन, असं म्हणत अनेकजण शीवतीर्थावर आहे. या सर्वांना मनापासून धन्यवाद. ही परंपरा कालपर्वाची नाही, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांचे आभार मानले.

## शॉर्ट न्यूज

### ठाण्यात महाप्रबोधन यात्रेला ठाकरे समर्थकांची मोठी गर्दी



**। ठाणे । महाईन्यूज ।**

शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने गोठवल्यानंतर आणि शिवसेनेतील फुटीचे केंद्रबिंदू असलेल्या ठाणे शहरातुन रविवारी महाप्रबोधन यात्रेला ठाकरे गटाने सुरुवात केली असून या यात्रेच्या निमित्ताने ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात शिवसैनिकांनी मोठी गर्दी केली होती. गद्दारांनी नाव आणि चिन्ह गोठवले पण, खुद्दारांनी रक्त पेटवले, अशा घोषणा नेत्यांसह शिवसैनिकांनी दिल्या. रविवारी सायंकाळी वाजत गाजत शिवसैनिकांचे जथे गडकरी रंगायतनमध्ये दाखल होत होते. गडकरी रंगायतनचे सभागृह भरले होते. त्यामुळे रंगायतनच्या आवारात लावलेल्या स्क्रीनवर अनेक शिवसैनिकांनी भाषण ऐकली. या यात्रेत बोलताना शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महाप्रबोधन यात्रा काढण्यामागचे कारण स्पष्ट केले.

# श्री धुंदीबाबा विद्यालयात "कर्मवीर जयंती सोहळा" उत्साहात साजरा

## विद्यालयातील चिमुकल्या मुलांनी वारकरी वेश परिधान करून शोभायात्रे नोंदविला सहभाग

**।मेढा (ता. जावली)। । महाईन्यूज । चित्रा शिंदे-गुजर**

**बहुजनांना शिक्षणाची दारे खुली करून देणारे महान भगीरथ, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेचे श्री धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले 22 सप्टेंबर १८८७ साली जन्मलेल्या भाऊरावांनी शिक्षणाची ज्ञानगंगा खेडोपाडी पोहोचवली.**





दिनांक 22 सप्टेंबर रोजी विद्यालयातून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची शोभायात्रा सोनगावातून काढण्यात आली या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक वृंद व परिसरातील ग्रामस्थ सहभागी झाले होते. या शोभायात्रेमध्ये विद्यालयातील चिमुकल्या मुलांनी वारकरी वेश परिधान करून शोभायात्रेची शोभा अधिकच वाढवली.

तसेच या शोभायात्रेत लेझीम पथक, तीन पावली नृत्य या पारंपारिक प्रकारांनी यात्रेत रंगत वाढवली. दिनांक 23 सप्टेंबर रोजी विद्यालयात सभा कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष पिसाळभाऊ प्रमुख पाहुणे भरत साळुंखेसर प्रमुख उपस्थिती एस. एल. शिंदेसर, डॉ. पी. बी.गायकवाड, संतोष आप्पा शिंदे तसेच मुख्याध्यापक जाधव टी. बीसर यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच कर्मवीर जयंतीचे औचित्य साधून विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे उपशिक्षक लांडेसर यांनी विद्यार्थ्यांना कर्मवीर अण्णांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून त्यांच्या कार्याची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोसले मॅडम यांनी करून, काटवटेसर यांनी आभार मानले अशा पद्धतीने श्री धुंदीबाबा विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आली.

# गुजरातनजीक गोळीबार करत पाकिस्तान नौदलाकडून भारतीय मच्छीमारांचे अपहरण

## मच्छिमारांचे अपहरण आणि हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी 20 ते 25 पाकिस्तानी नौदलाच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे

**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गुजरात किनाऱ्याजवळील अरबी समुद्रात सात भारतीय मच्छिमारांचे अपहरण आणि हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी 20 ते 25 पाकिस्तानी नौदलाच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे. नौदलाच्या जवानांनी मच्छिमारांवर गोळीबार सुरु केल्याचा आरोप आहे. या घटनेत बोटीचे नुकसान झाले असून बोट बुडण्यापासून थोडक्यात बचावली आहे. ज्यानंतर त्यांचे अपहरण करण्यात आले.**



मिळालेल्या माहितीनुसार, 6 ऑक्टोबर रोजी सात मच्छिमार एका बोडीतून जखाऊ किनारपट्टीवर भारतीय हद्दीत मासेमारी करत होते. त्यावेळी पाकिस्तान सागरी सुरक्षा संस्थेच्या बोटीवरील 20 ते 25 सैनिकांनी भारतीय बोटीवर विनाकारण बेछूट गोळीबार केला. तसेच बोट नष्ट करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पाकिस्तानी जवानांनी मच्छिमारांचे अपहरण करत त्यांना त्यांच्या बोटीत नेले, यावेळी भारतीय मच्छीमारांना लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत सर्व भारतीय मच्छिमार गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

या एफआयआरमध्ये म्हटले आहे की, पाकिस्तानी सैनिकांनी मारहाणीचा व्हिडिओही बनवला ज्यात मच्छिमारांना धमकावून सोडून दिले. यावेळी पोरबंदरचे पोलीस अधीक्षक रवी मोहन सैनी यांनी सांगितले की, शुक्रवारी भारतीय तटरक्षक दलाच्या बोटीद्वारे मच्छिमारांची सुटका करून गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील जखाऊ बंदरात आणण्यात आले. यानंतर जखाऊ येथे एफआयआर नोंदविण्यात आला आणि पोरबंदर जिल्ह्यातील नबीबंदर या पोलीस ठाण्यात हस्तांतरित करण्यात आला. ज्यांचे प्रादेशिक कार्यक्षेत्र गुजरात किनारपट्टीपासून १२ नॉटिकल मैलांपेक्षा जास्त आहे.

एफआयआरनुसार, भारतीय दंडाच्या कलम 307 (हत्येचा प्रयत्न), 365 (अपहरण), 427 (दुखापत करणे), 324 (स्वेच्छेने दुखापत करणे) आणि 506 (1) अंतर्गत पाकिस्तानी नौदलाच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक रवीमोहन सैनी यांनी सांगितले की, मच्छिमारांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास स्पेशल ऑपरेशन ग्रुपच्या उपनिरीक्षकांकडे सोपवण्यात आला आहे.

# अदानी-अंबानी असो, की जय शाह, राजस्थानात गुंतवणुकीसाठी स्वागत!

## मुख्यमंत्री गेहलोत यांचे भाजपला प्रत्युत्तर

**। जयपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

‘इन्व्हेस्ट राजस्थान’ सोहळ्यात उद्योगपती गौतम अदानी यांची प्रशंसा केल्याबद्दल भाजपने काँग्रेसची खिल्ली उडवली होती. भाजपला प्रत्युत्तर देताना राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी शनिवारी स्पष्ट केले, की हा खासगी कार्यक्रम नव्हता. त्याला तीन हजार प्रतिनिधी उपस्थित होते. राजस्थानला गुंतवणूक व रोजगार हवा आहे. मग त्यासाठी गौतम अदानी-अंबानी असो की केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा मुलगा जय शहा असो.. आम्ही त्याचे स्वागत करू.

‘इन्व्हेस्ट राजस्थान’ हा खासगी कार्यक्रम नसून ते गुंतवणूकदारांचे संमेलन होते. काँग्रेसच्या प्रतिनिधींचे नव्हते. या वेळी उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची विचारधारा काँग्रेस किंवा भाजपची असू शकते, असे सांगून गेहलोत म्हणाले, की विरोधक जाणून बुजून अडथळे निर्माण करत आहेत. मी त्यांचा निषेध करतो. अदानींना लक्ष्य करत राहुल गांधी पंतप्रधान मोदी केवळ बड्या उद्योगपतींनाच मदत करतात, असा आरोप अनेकदा करतात. तर, गेहलोत यांनी अदानींना गौतम भाई असे संबोधून, जगातील दुसरे सर्वात श्रीमंत व्यक्ती बनल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते.



**‘इन्व्हेस्ट राजस्थान’ हा खासगी कार्यक्रम नसून ते गुंतवणूकदारांचे संमेलन होते. काँग्रेसच्या प्रतिनिधींचे नव्हते. या वेळी उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची विचारधारा काँग्रेस किंवा भाजपची असू शकते, असे सांगून गेहलोत म्हणाले, की विरोधक जाणून बुजून अडथळे निर्माण करत आहेत. मी त्यांचा निषेध करतो.**

# युक्रेनच्या अणुऊर्जा केंद्राचा वीजपुरवठा हल्ल्यामुळे बंद

## सुरक्षा उपकरणांबाबत चिंता

**। बर्लिन । महाईन्यूज ।**

युरोपमधील सर्वात मोठा अणुऊर्जा प्रकल्प असलेल्या युक्रेनच्या झापोरीझ्झिया प्रकल्पाचा बाह्य विद्युत पुरवठा शनिवारी खंडित झाला. रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे वाहिनीचे नुकसान झाल्याची माहिती आहे. सध्या या प्रकल्पातून वीजनिर्मिती बंद असली तरी किरणोत्सारी इंधन थंड ठेवण्यासह अन्य सुरक्षा उपकरणांसाठी विजेची गरज असून याची आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने (आयएईए) दखल घेतली आहे.

युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी आयएईएला दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार शनिवारी रात्री १ वाजता अणुऊर्जा केंद्राला बाहेरून होणारा वीजपुरवठा खंडित झाला. सध्या ‘जनरेटर’द्वारे वीज सुरू ठेवली असून १० दिवस पुरेल एवढे डिझेल शिल्लक आहे. तसेच वीजपुरवठा नियमित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र अणुऊर्जा केंद्रावर हल्ला करून वीजपुरवठा खंडित करणे ही बेजबाबदार कृती असल्याचे ताशेरे आयएईएने ओढले आहेत. मात्र संस्थेने अद्याप याबाबत कुणालाही जबाबदार धरलेले नाही.



# भाजपाने विरोधी पक्ष बनण्याची तयारी करावी, थरूर यांचे थेट आव्हान!

**काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी काँग्रेस अध्यक्षपदासाठी उमेदवारी जाहीर केली आहे. येत्या १७ ऑक्टोबरला ही निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ते प्रचाराला बाहेर पडले आहेत. हा प्रचार करताना थरूर यांनी भाजपालाही इशारा दिला आहे. “काँग्रेस पक्ष यशस्वी झाल्याचे आम्हाला मतदारांना दाखवायचे आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत आपल्याला केवळ 19 टक्के मते मिळाली होती. गेल्या दोन निवडणुकांपासून जे मतदार आमच्यासोबत नाहीत त्यांना सोबत आणायचे आहे. ते पुढे म्हणाले की, मतदारांनी आपल्यावर विश्वास दाखवावा यासाठी पक्ष आकर्षक आणि आत्मविश्वासपूर्ण असणे आवश्यक आहे, असं शशी थरूर म्हणाले.**

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस पक्षाने देश उत्तम चालवला आहे. पक्षाकडे अनुभवी लोक आहेत, असं काँग्रेस अध्यक्ष पदाचे उमेदवार आणि खासदार शशी थरुर यांनी म्हटलं आहे. तसंच, भाजपाने २०२४ च्या निवडणुकीनंतर विरोधी पक्ष बनण्याची तयारी करावी, असंही त्यांनी म्हटलं आहे. म्हणजे, येत्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस नव्या जोमाने येणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.



काँग्रेसचे खासदार शशी थरुर यांनी काँग्रेस अध्यक्षपदासाठी उमेदवारी जाहीर केली आहे. येत्या १७ ऑक्टोबरला ही निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ते प्रचाराला बाहेर पडले आहेत. हा प्रचार करताना थरूर यांनी भाजपालाही इशारा दिला आहे. “काँग्रेस पक्ष यशस्वी झाल्याचे आम्हाला मतदारांना दाखवायचे आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत आपल्याला केवळ 19 टक्के मते मिळाली होती. गेल्या दोन निवडणुकांपासून जे मतदार आमच्यासोबत नाहीत त्यांना सोबत आणायचे आहे. ते पुढे म्हणाले की, मतदारांनी आपल्यावर विश्वास दाखवावा यासाठी पक्ष आकर्षक आणि आत्मविश्वासपूर्ण असणे आवश्यक आहे, असं शशी थरुर म्हणाले.

थरूर म्हणाले की, आमच्या पक्षाला बदलाची गरज आहे आणि मला वाटते की केवळ मीच पक्षात बदल घडवून आणू शकतो. यावेळी थरूर यांनी केंद्रावर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले, “भाजपने विरोधी पक्ष बनण्याची तयारी सुरू केली पाहिजे कारण त्यांना 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर तिथेच बसावे लागेल.”

# श्रेया बुगडे आणि निर्मिती सावंत एकत्र?



हास्याचे कारंजे उडवणारे किस्से, विनोदी पंच,अनेक कलाकारांच्या नकला, हसून लोटपोट करायला लावणारे स्किट आणि सर्वात महत्वाचं म्हणजे उपस्थितांची फिरकी घेत विनोदाच्या राज्यातील दोन अभिनेत्री धमाल उडवून देण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. अभिनेत्री निर्मिती सावंत आणि श्रेया बुगडे विनोदाचे असे काही बार उडवणार आहेत की प्रेक्षकांवर घरबसल्या मनोरंजनाची आतिषबाजी होणार आहे. निमित्त आहे झी टॉकीज कॉमेडी अॅवार्ड सोहळयाचं. (दिवाळीपूर्वीच झी टॉकीज कॉमेडी अॅवार्डच्या मंचावर विनोदाच्या फटाक्यांचा दणका उडणार आहे. विनोदी नाटक आणि सिनेमातील पडदयावरील व पडद्यामागील कलाकारांचा गौरव होत असताना थिरकायला लावणारे डान्स, हसून लोटपोट करणारे स्किट आणि भन्नाट किस्से अशी मेजवानी झी टॉकीज प्रेक्षकांसाठी घेऊन आले आहे. प्रथमच दोन स्त्रिया करणार अवॉर्ड सोहळ्याचं अँकरिंग करणार आहेत .


रविवारी ९ ऑक्टोबरला दुपारी १२ आणि सायंकाळी ७ वाजता झी टॉकीज या वाहिनीवर झी टॉकीज कॉमेडी अॅवार्डचा झगमगता आणि हास्याचे कारंजे फुलवणारा सोहळा प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

प्रेक्षकांना दर्जेदार आणि चांगले सिनेमे पाहता यावेत यासाठी झी टॉकीज या वाहिनीची सुरुवात झाली. १५ वर्षापूर्वी झी टॉकीज ही वाहिनी प्रेक्षकांच्या भेटीला आली आणि प्रेक्षकांच्या आवडीची बनली. झी टॉकीजची निर्मिती असलेल्या अनेक मराठी सिनेमांनी बॉक्स ऑफीसवर तुफान यश मिळवलं आहे. झी टॉकीजचा, सिनेमा, नाटक, कलाकार यांच्याशी वेगळा बंध आहे. त्यासाठीच कलाकारांचं कौतुक करण्याकरिता झी टॉकीज कॉमेडी अॅवार्डचा मंच घेऊन यंदाही जोशात आली आहे.

# दिशा पाटनीचे वडील करणार राजकारणात प्रवेश?

बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनी सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. आता पुन्हा एकदा ती चर्चेचा विषय ठरताना दिसत आहे. सध्या तिच्या वडिलांमुळे तिच्या नावाची चर्चा होताना दिसत आहे. दिशा पाटनीचे वडील जगदीश सिंह पाटनी लवकरच राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा होताना दिसत आहे. उत्तर प्रदेशमध्ये पोलीस अधिकारी असलेले जगदीश सिंह अलिकडेच निवृत्त झाले आहेत. आता ते बरेली शहरातून महापौर पदासाठी निवडणूक लढणार असल्याच्या चर्चा आहे.





दिशा पाटनीचे वडील राजकारणात प्रवेश करणार याची चर्चा शहरात त्यांच्या नाव आणि फोटोंचे होर्डिंग्स लागल्याने होऊ लागली आहे. ज्यानंतर जगदीश सिंह पाटनी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. त्यांना काही पक्षांकडून उमेदवारीसाठी तिकिट देण्यासाठी उत्सुकता दाखवली गेल्याची माहिती मिळत आहे. मात्र जगदीश सिंह यांनी अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. सर्व पर्याय आणि नीट विचार करूनच आपण निर्णय घेऊ असं त्यांनी सांगितलं आहे. दरम्यान दिशा पाटनीबद्दल बोलायचं तर तिने बॉलिवूड चित्रपट 'एम एस धोनी : द अनटोल्ड स्टोरी'मधून बॉलिवूड पदार्पण केलं होतं. पण आपल्या चित्रपटांपेक्षा ती टायगर श्रॉफसह असलेल्या रिलेशनशिपमुळेच जास्त चर्चेत राहिली होती. मध्यंतरीच्या काळात तिचं नाव आदित्य ठाकरे यांच्याशी जोडलं गेलं होतं. दिशाच्या कामाबद्दल बोलायचं तर अलिकडेच ती 'एक व्हिलन रिटर्न'मध्ये दिसली होती. आगामी काळात तिच्याकडे 'योद्धा' आणि 'प्रोजेक्ट' हे चित्रपट आहेत.

# शिव ठाकरेबद्दलचा प्रश्न विचारल्यानंतर वीणा जगताप संतापली

छोट्या पडद्यावरील सर्वांत लोकप्रिय आणि तितकाच वादग्रस्त रिॲलिटी शो म्हणून बिग बॉसकडे पाहिलं जातं. 'बिग बॉस मराठी'च्या दुसऱ्या पर्वातून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री म्हणून वीणा जगताप हिच्याकडे पाहिले जाते. ती नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. नुकतंच वीणा जगतापने तिच्या आणि शिव ठाकरेच्या नात्याबद्दल खुलासा केला आहे. तिने एका चाहत्याच्या प्रश्नाचे उत्तर देताना याबद्दल स्पष्टपणे मत व्यक्त केले.

बिग बॉस मराठी २ हे पर्व शिव आणि वीणा यांच्या लव्हस्टोरीमुळे चांगलाच गाजला. या दोघांच्या केमिस्ट्रीमुळे बिग बॉसला चार चांद लागले होते. विशेष म्हणजे वीणाने शिवच्या नावाचा टॅटूही हातावर गोंदवून घेतला होता. तसेच शिव बिग बॉसचा विजेता ठरल्यानंतर तिने जंगी सेलिब्रेशनही केले होते. ते दोघेही सोशल मीडियावर प्रेम व्यक्त करताना दिसले होते. मात्र त्यानंतर त्या दोघांचा ब्रेकअप झाल्याची माहिती समोर आली. त्यांचा ब्रेकअप का झाला? यामागचे कारण काय? दोघांमध्ये नेमकं काय बिनसलं? याबद्दल अनेक चर्चा रंगल्या. मात्र नुकतंच वीणाने याबद्दल मौन सोडत स्पष्टपणे भाष्य केलं. वीणाने नुकतंच इन्स्टाग्रामवर आस्क मी एनिथिंग




हे सेशन घेतलं. यावेळी तिला एका युझरने शिवबद्दल प्रश्न विचारला. शिव दादा आणि तुझ्यात काय सुरु आहे? असा प्रश्न तिला एका चाहत्याने विचारला. त्यावर उत्तर देताना ती चांगलीच भडकली. तिने तिच्या या चाहत्याला सडेतोड उत्तर दिले.

"पहिले आणि शेवटचं.... मी कोणत्याही व्यक्तीला माझ्या खासगी आयुष्याबद्दल माहिती देण्यासाठी बांधील नाही. थोडीतरी नैतिकता बाळगा आणि इतरांना मोकळा श्वास घेऊ द्या. मी कधी तुम्हाला तुमच्या आयुष्याबद्दल विचारते का? की तुमचे काय सुरु आहे आणि काय नाही? कारण मी नेहमी माझ्याबद्दल आणि माझ्यापुरती मर्यादित असते", असे वीणा म्हणाली. वीणाने दिलेल्या या उत्तरामुळे तिचे आणि शिवचे बिनसलं असल्याचे उघड झालं आहे. दरम्यान सध्या शिव हा बिग बॉस हिंदीच्या १६ व्या पर्वात सदस्य म्हणून सहभागी झाला आहे.

# 'कांतारा'चा हिंदी ट्रेलर प्रदर्शित



सध्या बॉक्स ऑफिसवर दाक्षिणात्य चित्रपटांचे वर्चस्व आहे. पॅन इंडिया या संकल्पनेचा फायदा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीला झाला. वेगवेगळे विषय, चित्रपट निर्मितीमध्ये होणारे नवे प्रयोग, सादरीकरणातील नाविन्य अशा काही कारणांमुळे प्रेक्षक या चित्रपटांकडे वळले आहे. दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये प्रादेशिक स्वाभिमान देखील पाहायला मिळतो. 'बाहुबली', 'पुष्पा', 'केजीएफ' असे अनेक चित्रपट बॉलिवूडच्या हिंदी चित्रपटांपेक्षा सरस ठरत आहेत. या यादीमध्ये 'कांतारा' या कन्नड चित्रपटाचे नाव जोडले गेले आहे. हा कन्नड चित्रपट ३० सप्टेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. कन्नडसह अन्य भाषिक प्रेक्षकांनी या चित्रपटाचे कौतुक केले. बॉक्स ऑफिस कलेक्शनच्या माध्यमातून चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती निर्मात्यांना मिळाली. पुढे त्यांनी हिंदीसह तमिळ, तेलुगू आणि मल्याळम या भाषांमध्ये डब करुन प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. ऋषभ शेट्टी हे या चित्रपटाचे सर्वेसर्वा आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### राफेल नदालच्या घरी छोट्या पाहुण्याचे आगमन



।नवी दिल्ली। महाईन्यूज

टेनिसमध्ये २२ ग्रँडस्लॅम जिंकणारा चॅम्पियन खेळाडू राफेल नदालच्या घरी एक छोटासा पाहुणा आला आहे. स्पॅनिश मीडिया आणि फुटबॉल क्लब रियल माद्रिदच्या म्हणण्यानुसार, नदालची पत्नी मारियाने मुलाला जन्म दिला आहे. आई आणि मूल दोघेही निरोगी असून नदालच्या संघाने याबातमीला दुजोरा दिलेला आहे. टेनिस स्टार राफेल नदाल वडील झाल्याची बातमी स्पॅनिश मीडियाने शनिवारी दिली. वृत्तपत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नदालची पत्नी मारिया फ्रान्सिस्का पेरेलो हिने माजोर्का येथील एका खासगी क्लिनिकमध्ये मुलाला जन्म दिला आहे. नदाल आणि मारिया यांनी तीन वर्षांपूर्वी लग्नगाठ बांधली होती. राफेल नदालने हा आनंद काही महिन्यांपूर्वीच चाहत्यांसोबत शेअर केला होता. त्याच्या पत्नीने स्पेनमधील एका खासगी क्लिनिकमध्ये मुलाला जन्म दिल्याचे कळते.

# श्रेयस-ईशानची धुवांधार फलंदाजी!

## भारताचा दक्षिण आफ्रिकेवर 7 गड्यांनी विजय, मालिकेत 1-1 बरोबरी

अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना रांची येथे झाला. मालिकेतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा ९ धावांनी पराभव केला होता. त्या पराभवाचा बदला घेत भारताने दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर तब्बल सात गडी राखून विजय मिळवला. आजच्या विजयाने भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या नेतृत्वाची जबाबदारी केशव महाराज सांभाळत आहे. श्रेयस अय्यरने विजयी धाव काढत सामना भारताच्या नावावर केला. त्यालाच सामनावीराचा किताब देण्यात आला.

धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात देखील निराशाजनक झाली. कर्णधार शिखर धवनने फक्त १३ धावा केल्या. सलामीवीर शुबमन गिल आणि धवन बाद झाल्यानंतर ईशान किशन आणि श्रेयस अय्यर या दोघांमध्ये तब्बल दीडशतकी भागीदारी झाली. त्यांच्यात १६१ धावांची भागीदारी झाली. ईशानचे शतक सात धावांनी हुकले. मात्र श्रेयस अय्यरने आपले दुसरे शतक पूर्ण केले. त्याने १११ चेंडूत ११३ धावांची दमदार खेळी केली. दक्षिण आफ्रिकेची गोलंदाजी आज फार चांगली झाली नाही. दव जास्त पडल्याने आफ्रिकन गोलंदाजांना चेंडू फेकण्यात अडचणी येत होत्या. वेगवान गोलंदाज ब्योर्न फॉर्च्युइन, वेन पारनेल आणि कगिसो रबाडा या तिघांनी मिळून १- १ गडी बाद केला. फिरकीपटू मात्र अपयशी ठरले. तत्पूर्वी,केशव महाराजने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात खराब झाली. सलामीवीर

# सरचिटणीसाऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी निवडा!

## 'आयओसी'ची भारतीय ऑलिम्पिक संघटनेला अतिरिक्त सूचना

अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारतीय ऑलिम्पिक संघटनेची (आयओए) निवडणूक घेण्यापूर्वी प्रस्तावित घटनादुरुस्तीचा अंतिम मसुदा तयार करताना निवडून आलेल्या सरचिटणीसपदाऐवजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी आणखी एक सूचना आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) केली आहे.

'आयओसी'ने गेल्या महिन्यात 'आयओए' पदाधिकारी आणि क्रीडा मंत्रालयातील अधिकाऱ्यांची एक बैठक बोलावली होती. 'आयओसी'ची पुढील वार्षिक सर्वसाधारण बैठक ५ ते ७ डिसेंबरदरम्यान होणार असून, त्यापूर्वी घटनादुरुस्ती आणि निवडणूक प्रक्रिया 'आयओए'ला पूर्ण करणे बंधनकारक आहे. या एकूण परिस्थितीवर बैठकीत चर्चा करण्यात आली होती. या बैठकीत खेळाडूंना २५ टक्के आरक्षण, राज्य ऑलिम्पिक संघटनेचा मतदानाचा अधिकार काढून घेणे, क्रीडा महासंघांना केवळ एकाच मतदानाचा अधिकार, वयोमर्यादा, राजकीय व्यक्तीच्या सहभागावर बंधने नाहीत अशा सूचना केल्या होत्या. आता 'आयओए'कडे आलेल्या अंतिम सूचना पत्रात 'आयओसी'ने सरचिटणीस हे पद रद्द करून ते मुख्य कार्यकारी अधिकारीपदात वर्ग करावे आणि त्याची नियुक्ती ही 'आयओए'ची निवडून आलेली प्रशासकीय समिती करेल, अशी अतिरिक्त सूचना केली आहे.

### तातडीची बैठक

'आयओए'च्या हातात खूप कमी वेळ असल्यामुळे घटनादुरुस्तीसाठी सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या निवृत्त न्यायमूर्ती एलय नागेश्वरा राव यांनी १४ ऑक्टोबर रोजी देशातील क्रीडा महासंघाची तातडीची बैठक बोलावली आहे. त्याचबरोबर बैठकीस दिल्ली उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या खेळाडू सल्लागारांनाही बोलाविण्यात आले आहे. यामध्ये अंजू बॉबी जॉर्ज, अभिनव बिंद्रा, लैश्राम बोम्बायला देवी यांचा समावेश आहे.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही